# <u>प्रेसनोट</u>

## FICCI स्मार्ट पोलिसींग ॲवार्ड-२०१७ बाबत

दिनांक २४ व २५ मे रोजी फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज (FICCI)व विवेकानंद इंटरनॅशनल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नववा होमलॅन्ड सिक्युरीटी संदर्भातील कार्यक्रम नुकताच दिल्ली येथे पार पडला. सदर कार्यक्रमाची यावर्षीची संकल्पना ही आधुनिकीकरण व तांत्रीकीकरण याचा वापर करुन देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेसाठी करण्यात आलेल्या वेगवेगळ्या योजनांचे अवलोकन करुन त्यावर FICCI स्मार्ट पोलिसींग अवॉर्ड-२०१७ ठेवण्यात आले होते.

FICCI स्मार्ट पोलीसींग अवॉर्ड-२०१७ साठी देशभरातुन सेंट्रल आर्म पोलीस फोर्सेस व स्टेट पोलीस फोर्सेस यांच्या एकुण १३३ घटकांनी भाग घेतला होता. सदर कार्यक्रमामध्ये महिला सुरक्षा व सायबर सुरक्षा या दोनही विषयांवर महाराष्ट्रातून पुणे शहर पोलीस दलाला **"FICCI स्मार्ट पोलिसींग ॲवार्ड-२०१७"** ने सन्मानित केले आहे. मा.खासदार मिनाक्षी लेखी, राष्ट्रीय प्रवक्त्या भारतीय जनता पार्टी यांच्या हस्ते दि.२५ मे २०१७ रोजी पुणे पोलीस आयुक्त मा.श्रीमती रश्मी शुक्ला यांना सदर पुरस्कार देवून गौरविण्यात आले. महिला सुरक्षा या विषयावर पुर्ण भारतातुन एकुण १७ पोलीस घटकांनी व सायबर सुरक्षा या विषयासाठी ६ घटकांनी भाग घेतला होता.

पुणे शहर पोलीस दलाकडुन महिला रक्षिततेस प्राधान्य देण्यात आले असून, महिला सुरक्षे संदर्भात **"बडी कॉप"** ही योजना उत्तमप्रकारे राबविण्यात येत आहे. बडी कॉप या उपक्रमाच्या माध्यमातून सध्या आयटी क्षेत्रातील कार्यरत जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोलीस यंत्रणा पोहचलेली आहे. पोलीस स्टेशन स्तरावरील बडी कॉप व्हॉटस ॲप ग्रुपस बनविण्यात आले असून त्यामध्ये स्थानिक पोलीस कर्मचारी हे बडी कॉप म्हणून त्या ग्रुपमधील महिलांकरिता सुरक्षितेतेबाबतचे सर्व प्रश्न ताबडतोब सोडविण्यासाठी तत्पर आहेत. या ग्रुप मधील महिलांना कोणतीही अडचण आल्यास ते या बडी कॉपच्या माध्यमातून ग्रुपमध्ये अथवा वैयक्तिक स्तरावर सदर बडी कॉप सोबत चर्चा करतात व तात्काळ त्याबाबत समस्येचे निराकरण केले जाते. बडी कॉप या उपक्रमाच्या माध्यामातून यापूर्वी आय़टी क्षेत्रातील महिलांच्या अनेक समस्यांचे निकारण करण्यात आले असून त्यांच्या तक्रारीवरुन गुन्हे देखील दाखल करण्यात आले आहेत. सदर बडी कॉप हा उपक्रम पुढील टप्यामध्ये पुणे शहरातील सर्व पोलीस स्टेशन स्तरावर सर्व घटकातील महिलांकरिता राबवण्यिात येणार आहे.

सायबर सुरक्षे संदर्भात देखील पुणे शहर पोलीस दलाने उत्तमप्रकारे काम केले आहे. पुणे शहर पोलीस दलामार्फत डिजीटायझेशन ची कामे राबविण्यात आलेली आहेत. त्यामध्ये **"Lost & Found चे पोर्टल, Beat Marshal Monitoring Sapience App, Tenant Informaton system"** (भाडेकरु बाबतची माहिती) अशा प्रकारच्या डिजीटायझेशन ची कामे केली जात आहेत.